वाशिम, जिल्हा वाशिम येथे मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम यांचे नावे स्वीय प्रपंजी लेखा खाते सुरु करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पीएलए २८१५/प्र.क्र.४३/का.१२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२ जानेवारी, २०१६

<u>वाचा -</u>

१) अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी २७०७/१६६/डी-१२, दिनांक २७.०२.२०१३
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा न्यायालय वाशिम यांचे पत्र क्रमांक १०७९/२०१४, दिनांक १७.०४.२०१४

<u>प्रस्तावना -</u>

वाशिम, जिल्हा वाशिम येथे दिनांक २७.०२.२०१३ रोजी संदर्भाधीन अ.क्र.(१) येथे नमूद अधिसूचनेन्वये मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम यांचे न्यायालय निर्माण करण्यात आले आहे. मुख्य न्यायदंडाधिकारी वाशिम, जिल्हा वाशिम या नावाने स्वतंत्र स्वीय प्रपंजी लेखा खाते (P.L.A.) उघडण्यासाठी मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ४९६ सह ५११ ते ५१७ अनुसार दिवाणी व फौजदारी न्यायालयाकडील जमा रकमा व परतफेडीच्या रकमांसाठी कोषगारात स्वीय प्रपंजी खाते उघडण्याची तरतुद व कार्यपद्धतीनुसार वाशिम, जिल्हा वाशिम येथे मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम या न्यायालयासाठी स्वीय प्रपंजी लेखा खाते उघडण्याबाबत खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:

२. सदर लेखा खाते उघडल्यावर पुढील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे:

१) स्वीय प्रपंजी लेखा खात्यावर दिवाणी न्यायालयांच्या ठेवी आणि फौजदारी न्यायालयांच्या ठेवीशिवाय अन्य रकमा जमा करता येणार नाहीत.
२) स्वीय प्रपंजी लेखा खात्यातून होणारे व्यवहार राज्य शासनामार्फत निर्धारीत होतील.
३) स्वीय प्रपंजी लेखा खात्यामधून महसुली किंवा भांडवली खर्च भागविता येणार नाही.
४) स्वीय प्रपंजी लेखा खात्याचे वेळोवेळी लेखा परिक्षण करण्यात येईल.
५) एमटीआरच्या नियम ५१९ अनुसार स्वीय प्रपंजी लेखा खात्यातून काढलेली रक्कम ही प्राप्त रक्कमेपेक्षा जास्त असू नये.

३. या अटीच्या अधीन राहून वाशिम, जिल्हा वाशिम येथे मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम, जिल्हा वाशिम या न्यायालयासाठी थेट वाशिम येथील कोषागार अधिका-यांशी संपर्क साधून स्वीय प्रपंजी लेखा खाते उघडण्याची कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १६७/२०१५/कोषा प्र-५, दिनांक १०.०८.२०१५ अन्वये व महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक TM/Ch.२/UOR/L&JD/२०१५-१६/७४६, दिनांक १८.०९.२०१५ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१५४००१८६१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neeraj Pradip Dhote

Digitally signed by Neeraj Pradip Dhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=LA Cum Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=714efbf760da6c143fdf63d5ec3da8a8957b82d41451a5f202043ce4895e4205, cn=Neeraj Pradip Dhote
Date: 2016.01.22 15:40:35 +05'30'

(नीरज धोटे)
विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रबंधक (निरिक्षणे), मा.उच्च न्यायालय, अपील शाखा (पत्राने)
२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम,
३. मुख्य न्यायदंडाधिकारी, वाशिम, जिल्हा वाशिम,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा वाशिम,
७. उप जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम, जिल्हा वाशिम,
८. वित्त विभाग, मंत्रालय, व्यय-६ / कोषा प्र-५,
९. कक्ष अधिकारी, का-७/२३/२४/२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती (का.१२).